'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 164 - Mahatma Gandhi's Thoughts & Its Present Relevance
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

# महात्मा गांधीजींच्या पर्यावरण व निसर्गविषयक विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता

**श्री. बी. बी. घुरके**
सहाय्यक प्राध्यापक
भूगोलशास्त्र विभाग
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

**श्री. पी. एस. चौगुले**
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख
संख्याशास्त्र विभाग
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

**प्रा. एम. डी.कदम**
सहाय्यक प्राध्यापक
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज
कोल्हापूर

**सारांश:**

कोणत्याही पर्यावरणामध्ये जमीन पाणी हवा याची चांगली उपलब्धता यापासून पर्यावरणाची प्राथमिक विकासाची सुरवात होते. मात्र आज पर्यावरणाचा व निसर्गाचा ऱ्हास हा सार्वत्रिक चर्चेचा आणि चिंतनाचा जगभरामध्ये विषय बनला आहे. लोकसंख्येचा विस्फोट अशाश्वत औद्योगीकीकरण आणि अधिनिक जीवनशैली यामुळे निसर्गाचा होणारा ऱ्हास यास महात्मा गांधी हिंसाच मानत. भविष्यातील पिढीला सधृढ निसर्ग पर्यावरण देण्यासाठी मानव व पर्यावरण यांच्यातील सहसंबंध जपले पाहिजेत याच अनुषंगाने महात्मा गांधीचे विचार होते. मानवाची प्रत्येक गरज पूर्ण होईल एवढे पृथ्वीतलावर आहे मात्र मनुष्य निसर्गाचे अमर्याद शोषण करत आहे. यादृष्टीने महात्मा गांधींचे विचार प्रसंगानुरूप बदल करून अमलबजावणी करण्याच्या योग्यतेचे आहेत.

**पारिभाषिक शब्द:** पर्यावरणाचा ऱ्हास, लोकसंख्या विस्फोट , हिंसा व पर्यावरण, आधुनिक जीवनशैली इ.

**प्रस्तावना :**

विकसनशील देशामध्ये पर्यावरण ऱ्हासाच्या कारणाविषयी व परिणामविषयीच्या जागृतेत वाढ होत आहे. व्यक्तिगत संघटना प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्षरीत्या पर्यावरण वाचवण्यसाठी प्रयत्न करतो. पर्यावरण संरक्षणासाठी व संवर्धनासाठी वचनबद्ध होऊन गांभीर्याने सातत्याने प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. या दृष्टीकोनातून भावी पिढीला चांगले पर्यावरण व निसर्ग देण्यासाठी महात्मा गांधीजींचे विचार याअनुषंगाने महत्वाचे आहेत. मानवी लालसी प्रवृत्तीमुळे मनुष्य निसर्गावर अत्याचार करत आला आहे. प्रचंड वृक्षतोड निसर्गाचा समतोल बिघडवन्यास कारणीभूत ठरली. पर्यावरणाला आपल्या मर्जीप्रमाणे वागवण्याच्या नादात हे विसरून गेला कि मर्यादा संपली कि निसर्गही आपला राग व्यक्त करतो. उदा.२६ जुलै २००५ मुंबईचा पाऊस, प्रलय, त्सुनामी, विकासाच्या नावावर निसर्गावर केलेले अतिक्रमण नको म्हणून निसर्गाने भूकंप, ज्वालामुखी, दुष्काळ निर्माण करून पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्याचा संदेशच दिला आहे. प्लास्टिकमुळे मुंबई प्रत्येक वर्षी पावसाळ्यात तुंबते. निसर्गाचा कायदा एकाच सांगतो जगा आणि जगू द्या हे सांगत असताना निसर्ग सांगतो कि निसर्गाच्या आरोग्याशी खेळल तर नाश पावाल.

भौतिक गरजा, सामाजिक गरजा, आध्यात्मिक दृष्टीकोन या विविध पैलुतून पर्यावरणाकडे पहिले जाते. आधुनिक औद्योगिक समाजात तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर मानव व पर्यावरणाच्या परस्पर संबंधाकडे बघण्याच्या दृष्टीकोनात बदल झाला आहे. महात्मा गांधीजींचे विचार या बदललेल्या दृष्टीकोनात महत्वाचे आहेत. गरजेपुरतेच घ्यावेच, निसर्गाचे शोषण करू नये यासंदर्भात काही मोजकेच पण दिशादर्शक असणारे विचार उपलब्ध साहित्यातून मिळतात. मिळणाऱ्या उपलब्ध साहित्यातून निसर्गविषयक व पर्यावरणविषयक महात्मा गांधीजींच्या विचारांची समकालीन उपयुक्तता याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.